# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

दिनांक 07/10/2020 (बुधवार)
(दुपार)

---

### दुखापत

पो.स्टे. कन्हान :– अंतर्गत 1 कि. मी अंतरावर धरम नगर, कन्हान येथे दिनांक 29/09/2020 चे 21:00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– कुमारी अनामिका गराडे, वय 18 वर्ष, रा. धरमनगर कन्हान ही तिचा लहान बहीणी सोबत घरी हजर असता आरोपी नामे– विष्णु दुदबावणे, वय 25 वर्ष, रा. पिपरी दुर्गा मंदीर मागे, कन्हान हा फिर्यादीच्या घरा समोर येवुन फिर्यादीच्या लहान बहीणी सोबत बोलत असता फिर्यादिने तिच्या लहान बहीणीस रागवुन तिचा हात पकडुन घरी आत नेत असतांना आरोपीने फिर्यादीस म्हटले की, “तिला आत का नेत आहे” असे बोलुन आरोपीने त्याचा जवळील असलेल्या चाकु सारख्या वस्तुने फिर्यादीचा उजव्या हाताचा दंडावर मारून फिर्यादीस जखमी करून पळुन गेला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम 324 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. यातील आरोपीला अटक करण्यात आली आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोहवा खुशाल रामटेके पो स्टे कन्हान मो.नं. 8485861442 हे करीत आहे.

### अवैधरीत्या शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीला अटक

1) पो.स्टे. खापरखेडा :– अंतर्गत मौजा खापरखेडा आबादी वार्ड आबादी, इंदीरा नगर येथे दिनांक 06/10/2020 चे 19:10 वा. ते 20:00 वा. दरम्यान आरोपी नामे– अश्विन शामराव ढोणे, वय 24 वर्ष, रा. आबादी, इंदिरा नगर खापरखेडा हा बनावटी देशी कट्टा कि. 10,000/– रू व जिवंत 2 काडतुस कि. 1000/– रू. चा मुद्देमाल स्वतः जवळ हस्तक्षेपनीय गुन्हा करण्याच्या ईरादयाने बाळगुन मिळुन आला. सदर हत्याराबाबत आरोपीला परवाना विचारला असता त्याच्या जवळ कोणत्याही प्रकारचे कागदपत्रे मिळुन आले नाही.

सदर प्रकरणी सरकार तर्फे पोहवा श्री. उमेश ठाकरे, पोस्टे. खापरखेडा यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम 3, 25 भारतीय हत्यार कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. नमुद आरोपीस अटक करण्यात आली असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार श्री. बंडु कोकाटे हे करीत आहेत.

2) पो.स्टे. एमआयडीसी बोरी :– अंतर्गत 1 कि. मी. मौजा टेंभरी चौक येथे दिनांक 05/10/2020 चे 09.00 वा. ते 10.41 वा. दरम्यान आरोपी नामे– मोरेश्वर सिताराम दोडके, वय 53 वर्ष, रा. चन्नेवाडा ता. पवनी, जि. भंडारा ह. मु. बुट्टीबोरी ता. जि. नागपूर हा जुन्यावादाच्या कारणावरून फिर्यादी नामे– श्रीराम बालाप्रसाद तिवारी, वय 53 वर्ष, रा. टेंभरी ता.हिंगणा जि.नागपुर यांचे घरासमोर हातात चाकु घेवून आला व फिर्यादीला शिवीगाळ करून मारण्याची धमकी दिली. त्यादरम्यान आजुबाजूचे लोक बाहेर येताच आरोपी हा तेथुन पळून गेला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे एमआयडीसी बोरी येथे आरोपीविरुध्द कलम 504, 506 भा.द.वी. सहकलम 4, 25 भारतीय हत्यार कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. नमुद आरोपीस अटक करण्यात आली असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार शैलेश नागरे 7743919809 हे करीत आहेत.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर